




Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७५७. वा | बुधवार | दि. ०१ मे २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये





# तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक झोपा काढत होते की काय?

## आरोग्य उपसंचालकांच्या सहा स्मरणपत्रांनंतर ही माहिती देण्यासाठी आली नाही जाग...

पोस्टमार्टम ७४

**पुढील सत्रात करोडो रुपयांचे काम न करता बिले संबंधित ठेकेदाराला अदा केल्याची गौप्यस्फोट सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन पुराव्यानीशी करून आरोग्य प्रशासनाला अर्थपूर्ण कुंभकर्णी झोपेतून जाग करून या साखळीतल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्याचे पोस्टमार्टम करणार**




जनसंचलन/बुलढाणा

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या लेखापरीक्षणासंदर्भात अकोल्याच्या आरोग्य उपसंचालकांनी माहिती देण्यासंदर्भात सहा स्मरणपत्रे दिल्यानंतरही तत्कालीन बुलढाणा जिल्हा शल्यचिकित्सकांनी अक्षम्य दिरंगाई करीत माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे उघड झाले आहे. यासंदर्भातील माहिती ही आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई कार्यालयाच्या वतीने लोकांयुक्तांना दिली आहे. यावरून एक स्पष्ट आहे की, बुलढाण्याचे तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक हे ढाराडूर झोपा काढत होते. कारण सहा स्मरणपत्रे द्यावी लागतात, यापेक्षा जास्ती लाजीरवाणी बाब एका अधिकाऱ्यासाठी काहीही असू शकत नाही. परंतु बुलढाण्याचे तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सकांनी हा लाज-िरवाणा पराक्रम केल्याचे आता सिद्ध झाले आहे. येथील जिल्हा रुग्णालयात झालेल्या औषधी व साहित्य, उपकरणांच्या घोटाळ्यांसंदर्भात एकीकडे सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन तर सातत्याने वृत्त प्रकाशित करून हा भ्रष्टाचार आणि भ्रष्टाचाऱ्यांचे काळवंडलेले चेहरे जनतेसमोर उघड करीत आहेतच, परंतु काही सामाजिक कार्यकर्तेही यामध्ये हिरीरीने पुढाकार घेत आ-हेत. यापैकीच एक म्हणजे चंद्रकांत खरात हे आहेत. चंद्रकांत खरात यांनी काही महिन्यांपूर्वी लोकायुक्त मुंबई यांच्याकडे जिल्हा रुग्णालयातील औषधी व साहित्य, उपकरणांच्या खरेदीत झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्यासंबंधी तक्रार केली होती. या तक्रारीची दखल घेत लोकायुक्तांनी आरोग्य सेवा आयुक्तालयाला पत्र पाठवले होते. या पत्रावर आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई यांनी लोकायुक्तांना पत्र पाठवून यासंदर्भातील सविस्तर माहिती दिली आहे. या माहितीत असे दिसून येते की, जिल्हा रुग्णालयात झालेल्या गैरव्यवहारासंबंधी लेखा-परीक्षण करण्यात आले. या लेखापरीक्षणात स्पष्टपणे आढळून आले की, साहित्य, औषधी व उपकरणांच्या खरेदीत प्रचंड मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. त्यामुळे या घोटाळ्यासंदर्भात आणखी माहिती देण्यासंदर्भात आयुक्त कार्यालयाने आरोग्य उपसंचालक अकोला यांना यासंदर्भात अहवाल देण्याचे सांगितले. आरोग्य उपसंचालक अकोला यांनी मग जिल्हा शल्यचिकित्सकांना यासंदर्भात माहिती देण्यास सांगितले. मात्र, तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सकांनी जाणुनबुजून चौकशी लांबवण्यासाठी यासंदर्भातील अहवाल हा आरोग्य उपसंचालकांकडे पाठवलाच नाही. यासंदर्भात आरोग्य उपसंचालक अकोला कार्यालयाकडून २१-०६-२०२२ ते २०-०३-२०२३ या नऊ महिन्यांच्या कालावधीत बुलढाणा जिल्हा शल्यचिकित्सकांना तब्बल सहा वेळा स्मरणपत्रे दिली. मात्र, नेहमी चर्चेतील तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सकांनी ढिसाळपणाचा कळस गाठत आपल्याच अधिकाऱ्यांच्या पत्रांना केराची टोपली दाखवली. सहा स्मरण पत्रे मिळून देखील जिल्हा शल्यचिकित्सकांनी ही माहिती देण्यास मोठी टाळाटाळ केली. यावरून हे स्पष्ट आहे की, तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक जाणुनबुजून ही चौकशी रेंगाळवण्याचे काम करीत होते. या माध्यमातून जिल्हा शल्यचिकित्सक हे भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्याचे काम करीत होते. किंबहुना स्वतः जिल्हा शल्यचिकित्सक हे या भ्रष्टाचारात सामिल असण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळेच ते अशाप्रकारची टाळाटाळ करीत होते. अखेर वरिष्ठांकडून वारंवार दट्ट्या बसल्यामुळे नाईलाजाने जिल्हा शल्यचिकित्सकांनी शेवटचे स्मरण पत्र मिळाल्यानंतर तब्बल सहा महिन्यांनी म्हणजे १९-०९-२०२३ रोजी आपला अहवाल सादर केला. त्यानंतर आरोग्य उपसंचालकांनी यासंदर्भात एक चौकशी समिती गठित करून यासंदर्भात अह-वाल वरिष्ठांना देण्यात येईल, असे उत्तर हे आर-ोग्य सेवा आयुक्तालय मुंबई यांना कळवले होते. आरोग्य विभागातील या भ्रष्टाचारात वरपासून खालपर्यंत सर्वांचेच लागेबांधे दिसत आहेत. कारण या भ्रष्टाचारासंदर्भात फक्त कागदी घोडे नाचवण्याचे काम केले जात आहेत. एक अधिकारी दुसऱ्या अधिकाऱ्यावर जबाबदारी ढकलून स्वतः चे घोंगडे झटकण्याचे काम करीत आहे. अशाने आरोग्य विभागातील भ्रष्टाचाऱ्यांचे फावते आहे. या भ्रष्टाचारात कोण-कोण सामिल आहेत आणि त्यांचा कसा यात हात आहे, *यासंदर्भातील व जिल्ह्य सामान्य रुग्णालय अंतर्गत करोडो रुपये खर्च करून मॉड्युलर ओटी व मॉड्युलर लेबर रूम गोलमाल प्रकरणाची माहिती आम्ही पुढील भागात प्रकाशित करणार आहोत.*सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन जिल्हा आरोग्य विभागात बोकाळलेल्या या भ्रष्टाचारात जे-जे खलनायक आहेत, त्या सर्वांचे बुरखे फाडल्याशिवाय राहणार नाही.

अजून बरेच काही पुढील भागात...

# भूलथापा देऊन वृध्द महिलेच्या गळ्यातील पोथ लंपास

जनसंचलन/ शेगाव

सोन्याची पोथ लंपास करण्यासाठी चोरट्याने एका वृद्ध महिलेला मारवाड्याला मुलगा झाला आहे ते लोक दान देत आहेत चला तुम्ही असे म्हणून माणिक स्टोअर जवळच्या पवन मेडिकल समोर आणून बसवले व गळ्यात असलेली सोन्याची पोथ मोठ्या शिताफीने लंपास केल्याची घटना २५ एप्रिल रोजी घडली. याबाबत सुलोचना विश्वनाथ भिवटे वय ६८ वर्ष रा. दुर्गा नगर आकोट रोड शेगाव यांनी २७ एप्रिल रोजी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली की, (ता. २५) ला त्यांचा नातू गोविंदासह बँकेतून पैसे काढण्यासाठी गेल्या होत्या.महाराज चौक येथे उभे असताना त्यांना एक अनोळखी इसमाने मारवाड्याला मुलगा झाला आहे ते लोक दान देत आहे तुम्ही चला असे म्हणून त्यांना पवन मेडिकल समोर नेऊन तिथे पायरीवर बसविले. येथेच दान मिळणार आहे तुम्ही इथेच बसा असे म्हणून फिर्यादी यांना त्यांच्या गळ्यातील सोन्याची पोत काढून त्यांचे जवळील बटव्यामध्ये ठेवण्यास सांगितले. त्यानंतर चोरट्याने बटव्याची पिशवी सुलोचना भिवटे यांच्या जवळील पांढऱ्या रुमालामध्ये बांधली व सदर रुमाल भिवटे यांच्या जवळील थैलीमध्ये टाकला व तुम्ही इथेच बसा इथे दान मिळणार आहे असे सांगून तिथून निघून गेला. त्यानंतर त्यांनी पिशवीत ठेवलेला रुमाल उघडून बघितला असता बटव्यामध्ये पेंडोलसह १२ ग्राम वजनाची सोन्याची पोथ किंमत ६० हजार रूपये नसल्याचे दिसून आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर सुलोचना भिवटे यांनी शहर पोलिस स्टेशनला तक्रार नोदविली. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात आर-ोपीवर कलम ४२० भादवी अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर घटना जवळच असलेल्या एका सीसीटिव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली असून पोलिस चोरट्याचा शोध घेत आहेत.

# गळफास घेऊन ३८ वर्षीय व्यक्तीने केली आत्महत्या

जनसंचलन/चिखली

अडोतीस वर्षीय युवकाने एका शेतातील आंब्याच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. सदर घटना येथून जवळच असलेल्या हरणी येथे २९ एप्रिल रोजी सकाळी उघडकीस आली. अमडापूर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या हरणी येथील अर्जुन नंदू चव्हाण वय ३८ वर्ष यांनी गावानजीच्या एका शेतात आंब्याच्या झाडाला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली सदर घटनेची माहिती अमडापूर पो-लीस स्टेशनला दिल्यानंतर पोलिसांनी



घटनास्थळी येऊन पंचनामा करीत प्रेत उत्तरीय तपासणीसाठी चिखलीला रव-ाना केले तर दुपारच्या सुमारास हरणी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे पश्चात मुलगा, २ मुली, पत्नीसह बराच मोठा आप्तपरिवार आहे. पुढील तपास अमडापुर पोलीस करीत असून सदर घटनेने हरणी येथे हळहळ व्यक्त होत आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# खरीप हंगामात उत्पादकता वाढीवर लक्ष केंद्रीत करावे- जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात सोयाबीन आणि कापूस पिकांवर शेतकऱ्यांची अवलंबितता अधिक आहे. या शेतकऱ्यांवर अरिष्ट ओढविल्यास त्यांची परिस्थिती बिकट होते. त्यामुळे शेतकऱ्यांना फायदेशीर आणि त्यांची उत्पादकता वाढणारी पिके घेण्याकडे शेतकऱ्यांचे लक्ष केंद्रीत करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले. आज जिल्हाधिकारी कार्यालयात खरीप हंगामपूर्व आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी मनोज ढगे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले, येत्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन होणे गरजेचे आहे. गेल्या खरीप हंगामात सोयाबीन आणि कापूस या पिकांकडे शेतकऱ्यांचा कल अधिक होता. यावर्षी शेतकऱ्यांना नफा मिळवून देणारी पिके घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करावे. यासाठी त्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करावेत. शेतकऱ्यांना बोगस बियाणे विक्री होऊ नये म्हणून शेतकऱ्यांनी अधिकृत विक्रेत्यांकडून बियाणे खरेदी करावे, बियाणे खरेदीची पावती, पिशवी आदी सांभाळून ठेवण्याचे सांगावे. तसेच विक्रेत्यांची नावे आणि पत्ते जिल्ह्याच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करावेत. कोणत्याही परिस्थितीत बोगस




बियाणे विक्री होऊ नये, यासाठी भरारी पथकांची नियुक्ती करण्यात यावी. यासोबतच रासायनिक खतांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्यात यावा. शेतकऱ्यांना आधुनिक शेतीची माहिती देण्यात यावी. चांगले वाण आणि कमी पाण्यात चांगली उत्पादकता देणारी, तसेच शेतीमधील नवीन बाबींची माहिती देण्यात यावी. नवीन संशोधनाची माहिती देऊन शेतकऱ्यांना शेती संरक्षित करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना शेती सुकररित्या करण्यासाठी यांत्रिकीकरण आणि इतर योजनांचा लाभ देण्यात यावा. एकात्मिक पद्धतीने शेती करण्यासोबतच त्यांचा शेतकरी उत्पादक कंपनीशी समन्वय साधून देण्यात यावा. पिक विम्यामुळे शेतकऱ्यांना आपदग्रस्तवेळी मदत मिळण्यास मदत होते. यावर्षी २३४ कोटी रूपयांचा विमा शेतकऱ्यांना मिळाला आहे. विम्याची रक्कम मिळण्यास ईकेवासी नसल्याने अडचणी येत असल्यामुळे ईकेवायसी करण्यासाठी शेतकऱ्यांना सांगण्यात यावे. यासोबतच अपघात विम्याची रक्कम शेतकऱ्यांना मिळण्यासाठी प्रकरणे तातडीने निकाली काढावेत. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण करण्यात आला आहे. यातून ३३२ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. शेतकऱ्यांना मदतीसाठी पिक कर्ज महत्वाचे आहे. यावर्षी सर्व पात्र शेतकऱ्यांना कर्ज मिळावे, यासाठी प्रयत्न करावेत. बँकांनी कर्ज प्रक्रिया करण्यासाठी विशेष यंत्रणा तयार करावी. शेतकऱ्यांना मदतीसाठी नवीन वाणांची पिके देण्यात यावी. हळद, ओवा सारखी पिके घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करावे. तसेच फळ पिके, बांबू लागवड आणि वैरण विकासाची कामे करण्यात यावी. तसेच शेतकऱ्यांना ज्या योजनांमधून लाभ मिळणार आहे, अशा योजनांमध्ये त्यांचा सहभाग वाढविण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले.

# पाणीटंचाई निवारणासाठी कुपनलिका,विंधन विहिरी मंजूर

**जनसंचलन/बुलडाणा**

जिल्ह्यातील पाणीटंचाईवर उपाययोजना म्हणून ३९ गावापैकी १० गावात कुपनलिका आणि २९ गावात ४८ विंधन विहिरी मंजूर करण्यात आल्या आहेत. मलकापूर तालुक्यातील वडोदा, अनुराबाद, काळेगाव, भाडगणी, बेलाड, वाघुड, धरणगाव, तांदुळवाडी, म्हैसवाडी, रणथम, गोराड, नांदुरा तालुक्यातील खुमगाव, नवे इसरखेड, वडनेर भोलाजी, खामगाव तालुक्यातील लाखनवाडा बु., लाखनवाडा खु., कंचनपूर, वाहाळा खु., आडगाव, बोरी, बोथाकोजी, लोणार तालुक्यातील अजीसपूर, खुरमपूर, ब्राम्हणचिकणा, पिंपळखुटा, आरडव, देऊळगाव राजा तालुक्यातील भिवगाव बु.. तुळजापूर, पिंपळगाव बु., या गावांसाठी ४८ विंधन विहिरी, तर संग्रामपूर तालुक्यातील एकलारा, काकनवाडा बु., पिंप्री आडगाव, रूधाना, सावळी, रिंगणवाडी, सोनाळा, टुनकी बु., टुनकी खु., वानखेड या दहा गावांमध्ये दहा कुपनलिका मंजूर करण्यात आल्या आहे.

# मुलांचे शासकीय वसतीगृह खामगांव येथे प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ...

**जनसंचलन/ खामगांव**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत मा. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बुलढाणा यांचे अधिनस्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, खामगांव येथे शैक्षणिक सत्र २०२४-२५ करीता रिक्त असलेल्या फक्त शालेय विभागाकरीता (इ.८ वी ते १० वी करीता) प्रवेश प्रक्रिया दि. २ मे २०२४ पासून सुरु होणार असून प्रवेशाबाबतचे अर्ज कार्यालयात विनामूल्य उपलब्ध आहेत. सदर वसतीगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना शासन नियमानुसार अनुज्ञेय सर्व सोई-सुविधा मोफत पुरविण्यात येणार असून वसतीगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना दरमहा निर्वाह भत्ता, गणेवश भत्ता, स्टेशनरी, नाश्ता, भोजन, निवास इ. सोई-सुविधा मोफत पुरविण्यात येतात. तरी वसतीगृहात प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, खामगांव येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा असे आवाहन वसतीगृहाचे गृहपाल डी.बी.बोथिंगे यांनी केले आहे.

# केवायसीच्या बहाण्याने हार्डवेअर व्यावसायीकाची केली लाखोंने फसवणूक

**जनसंचलन/बुलडाणा**

ई केवायसी अपडेट करण्याचे नावाखाली साखरखेर्डा येथील एका हार्डवेअर दुकान मालकाची लाखो रुपयांची फसवणूक झाली. हार्डवेअर दुकानमालक हेमंत लाहोटी यांनी बुलडाणा सायबर पोलीस ठाण्यात २८ एप्रिलला तक्रार दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार हेमंत लाहोटी हे मेहकर येथील रहिवासी आहेत. त्यांचे साखरखेर्डा येथे चिंतामणी ट्रेडिंग कंपनी नावाचे हार्डवेअर दुकान आहे. यामुळे साखरखेर्डा ते मेहकर असा दररोजचा बस प्रवास ते करतात. लाहोटी यांचे साखरखेर्डा येथील स्टेट बँक शाखेत चालू खाते आहे. त्यात लाखोंची रोकड त्यांनी ठेवली होती. दरम्यान रविवारी त्यांच्या बँक खात्यात ११ लाख ३६ हजार ३२२ रुपये शिल्लक होते. दुपारी २ वाजता दुकानावर कामात असताना फोनवर एक टेक्स्ट मेसेज आल्याचा लाहोटी यांना दिसला. आलेल्या मेसेजमध्ये केवायसी अपडेट बाबत मजकूर असल्याने त्यांनी मेसेज मधील लिंक ओपन केली. त्यानंतर त्यात दिलेले फॉर्म भरत गेले. दरम्यान त्यांच्या मोबाईल मध्ये वेगवेगळे ओटीपी क्रमांक आल्याने त्यांनी ते फॉर्ममध्ये भरणे सुरू ठेवले. हे सुरू असताना, थोड्या वेळानंतर आलेले ओटीपीचे मेसेज बारकाईने पाहिले असता वेगवेगळ्या ओटीपीद्वारे टप्प्याटप्प्याने हजारो रुपये खात्यातून निघाल्याचे लाहोटींच्या लक्षात आले. एकूण ६५६०११ रुपये निघाल्याचे लक्षात येताच त्यांना धक्का बसला. त्यानंतर लहान भावासोबत तक्रार देण्यासाठी मेहकर पोलीस स्टेशन




गाठले असता पोलिसांनी बुलडाणा येथील सायबर पोलीस ठाण्यात जाण्याचे सांगितले. याआधी त्यांनी स्टेट बँक कस्टमर केअरला कॉलद्वारे बँक खाते बंद करण्याची विनंती केली. व ऑनलाइन फसवणूक झाल्याची तक्रार बुलडाणा सायबर पोलीस ठाण्यात देण्यात आली असे तक्रारीत म्हटले आहे. प्राप्त तक्रारीनुसार पोलिसांनी अनोळखी व्यक्तीवर फसवणुकीचा गुन्हा दाखल केलेला आहे. पुढील तपास सायबर पोलीस करत आहेत.

# भरधाव ट्रकची ऑटोला धडक नऊ जण जखमी...




**जनसंचलन/ खामगाव**

भरधाव ट्रकने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने ऑटो उलटून झालेल्या अपघातात पाच जण जखमी झाले. ही घटना नांदुरा रोडवरील लांजूड फाट्यावर रविवारी सकाळी घडली. अपघातानंतर ट्रक देखील उलटला. प्रवासी घेऊन एक ऑटो नांदुराकडे जात होता. त्याचवेळी पाठीमागून आलेल्या ट्रकने ऑटोला धडक दिली. या धडकेमुळे ऑटो उलटल्याने ऑटोतील प्रवासी जखमी झाले. यात गजानन धनसिंग चव्हाण, लीला फुलसिंग चव्हाण, महादेव देवसिंग डाबेराव, हरसिंग धनसिंग चव्हाण, आशा महादेव डाबेराव, दराबाई समाधान चव्हाण, कुसुम हरसिंग चव्हाण, निशा गजानन शेळे (सर्व रा. मोरगाव) व प्रमोद महादेव खंडारे (रा. पहुरजिरा) यांचा समावेश आहे. त्यांना खामगाव रुग्णालयात दाखल करून चौघांना अकोला हलविण्यात आले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रस्त्यावर अडवून मारहाण करीत दीड लाखाचे सोने पळविले...

**जनसंचलन/मलकापूर**

लग्नावरून कुटुंबासह घरी परत येत असतांना देवधाबा-भालेगाव रोडवरील संत मुक्ताईबाई मंदिराजवळ अडवून लोखंडी रॉड, गुप्तीने मारहाण करीत दीड लाख रूपयांचे दागिणे हिसकावून घेतल्या प्रकरणी दिलेल्या तक्रारीवरून ८ जणांविरूध्द मलकापूर ग्रामीण पोलिसांनी विविध कलमान्वये २८ एप्रिल रोजी गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी भुषण गोकुळ थोरात रा. मलकापूर ग्रामीण यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, मी व माझे वडील गोकुळ थोरात, आई वैशाली थोरात व भाऊ अमर थोरात आम्ही दोन दुचाकीने देवधाबा येथे नातेवाईकाकडे लग्न असल्याने गेलो होतो. लग्न लाऊन परत येत असतांना सायंकाळी ५.३० वाजे दरम्यान भालेगाव येथील मुक्ताई मंदिराजवळील टर्निंग जवळ आमच्या गाडीसमोर एकाने मोटार सायकल आडवी लावली. त्यावर तिघे जण बसले होते. त्यामधील अरविंद सोळंके याला मी ओळखत असून त्याने तलवार काढली तर इतरांना ओळखत नाही. दरम्यान दुसरी मोटार सायकल तेथे आली त्यावरही तिघे जण बसले होते. त्यातील देव ठाकूरला मी ओळखतो तर त्याच्या हाती गुप्ती होती. तर याचवेळी तिसऱ्या मोटार सायकलवर सुध्दा दोघे जण आले. यावेळी उपरोक्त मोटार सायकलवरील आठही जणांनी मला, माझ्या वडीलांना, आईला व भावाला गुप्ती, लोखंडी रॉडने मारहाण केली. तसेच माझ्या आईच्या गळ्यातील दोन तोळ्याची पोत अंदाजे




किं. १ लाख रू., वडीलांच्या हातातील १० ग्रॅमच्या २ सोन्यांच्या अंगठ्या अंदाजे किं. ५० हजार रूपये असा ऐवज जबरदस्तीने काढून घेत पळून गेले. या तक्रारीवरून पोलिसांनी अरविंद सोळंके, देव ठाकूर व इतर सहा जणांविरूध्द अप. क्र. ०१२२/२४ कलम ३९७, ३४१, २९४, ३९५, ५०४, ५०६, शस्त्र अधिनियम २५, ४ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# खामगाव मतदारसंघाचे सर्वाधिक मतदान!

**जनसंचलन/ खामगाव**

बुलढाणा लोकसभा मतदार संघाची निवडणूक नुकतीच पार पडली आहे. यामध्ये ६ विधानसभा मतदारसंघाचा समावेश असून सर्वाधिक मतदान यावेळी खामगाव विधानसभा मतदार संघातील मतदारांचे झाले आहे. इतर मतदार संघाच्या तुलनेत खामगाव विधानसभा मतदार संघाची टक्केवारी ही ६६ टक्के पार झाली आहे. लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात बुलढाणा लोकसभा मतदारसंघाची निवडणूक २६ एप्रिल रोजी झाली आहे. प्रत्येक मतदार संघातून सर्वाधिक मतदान व्हावे यासाठी कार्यकर्त्यांमध्येही चुरस होती. त्यात शासनानेही बुलढाणा लोकसभा मतदार संघाचे मतदान ७५ टक्के पारची घोषणा केली होती. परंतु प्रशासनाच्या या प्रयत्नाला यश आले नाही. खामगाव विधानसभा मतदार संघात झालेल्या मतदानाची टक्केवारीही ६६.२७ टक्के आहे. ही टक्केवारी इतर मतदारसंघाच्या तुलनेत सर्वाधिक आहे. कारण बुलढाणा लोकसभा मतदार संघात ५३.९६ टक्के, चिखली विधानसभा मतदार संघात ६२.२१ टक्के, जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघात ६३.५८ टक्के तर मेहकर विधानसभा मतदारसंघात ६४.८४ टक्के आणि सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघात ६१. ३४ टक्के मतदान झाल्याची नोंद निवडणूक विभागाने केली आहे व तशी आकडेवारी सुद्धा जाहीर केली आहे. खामगाव विधानसभा मतदारसंघाची वाढलेली टक्केवारी ही कोणत्या उमेदवाराच्या पथ्यावर पडली हे ४ जून नंतरच समजणार आहे. तर सर्वांत कमी मतदान बुलढाणा विधानसभा मतदार संघात झाले असून या कमी मतदानाचा फटका कोणत्या उमेदवाराला बसतो हे येणाऱ्या दिवसात समजणार आहे.

# कोण जिंकणार, कोण हरणार? गावातील पारावर चर्चेला आले चांगलेच उधाण...



**जनसंचलन/बुलढाणा**

लोकसभेच्या या रणसंग्रामात कोण जिंकणार, कोण हरणार, याविषयी शहरी भागातच नव्हे, तर गावातील पारावर चर्चेला उधाण आले आहे. निकालानंतर मतांच्या बेरीज-वजाबाकीचे खरे गणित बाहेर पडणार असले तरी सव्वा महिना टाइमपास करावा लागणार आहे. आतापर्यंत झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीनंतर सर्वाधिक मतमोजणीची प्रतीक्षा या निकालासाठी करावी लागत आहे. बुलढाणा लोकसभेच्या निवडणुकीत कोणाला किती मते मिळणार, कोणत्या उमेदवारांचा विजय होणार, यासाठी गणित लावले जात आहे. कोणत्या गावात, कोणत्या शहरात एवढेच नव्हे, तर मोहल्ला, परिसरात किती मते कुणाला मिळाली, याचा भागाकार गुणाकार राजकीय पक्षातील कार्यकर्ते करीत आहेत. आपल्याला या गटाची मते मिळाली नाहीत, असा दावा एक आहे. तर दुसऱ्या गटाकडूनही आपल्याला मते दिली नाहीत, असा प्रतिदावा होत असल्याने सर्वसामान्य मतदारांना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत

# महिलेचे सव्वा लाखांचे दागिने अज्ञात चोरट्याने केले लंपास...

**जनसंचलन/ चिखली**

मुंबईवरून चिखली येथे वडिलांना भेटण्यासाठी आलेल्या महिलेच्या बसमधील एक लाख पंधरा हजार रुपये किमतीच्या दागिन्यावर एसटी बस मध्ये चढताना अज्ञात आरोपीने डल्ला मारला असून महिलेच्या तक्रारीवरून चिखली पोलीस आणि अज्ञात आरोग्य गुन्हा दाखल केला आहे हकीकत अशाप्रकारे आहे की यातील फिर्यादी सौ. ललिता गजानन मोरे वय ४७ वर्ष रा. ३०३ परेरा अपारमेंट गावदेवी रोड पोयसर कांदिवली पश्चिम मुंबई ४०००६७ यांनी पोस्टेला रिपोर्ट दिला की मी पतीसह वडिलांना भेटण्यासाठी मुंबईवरून संभाजीनगर चिखली येथे दिनांक २७एप्रिल रोजी आली होती. भेट घेऊन २८ एप्रिलला संध्याकाळी ०६. ३५ वाजता मुंबईला परत जाण्यासाठी निघाली असता माझ्या जवळ ६ ग्रॅम वजनाची अंगठी, ३ तोळे ७ ग्राम वजनाची सोन्याची दोन डोरले असलेली सौभाग्यवती पोत किंमत अंदाजे १, २५,००० रूपये, पर्समध्ये छोटे पिवळे रंगाचे पाऊच मध्ये ठेवले होते. फिर्यादी ही पतीसह चिखली बस स्टँड वर स्लीपर कोच बसमध्ये जाण्यासाठी चढले असता अकोला अंबड जाणारी शिवशाही बस आली. सदर बस मध्ये जागा आहे म्हणून स्लीपर कोच बस मधून उतरून अकोला अंबड जाणाऱ्या शिवशाही बस मध्ये बसली. तेव्हा पर्सची चैन उघडी असल्याची दिसली व त्यात सोन्याचे



दागिने ठेवलेली पर्स दिसले नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे समजल्याने २९एप्रिल रोजी फिर्यादी सौ ललिता गजानन मोरे वय ४७ वर्ष रा. ३०३ परेरा अपारमेंट गावदेवी रोड पोयसर कांदिवली पश्चिम मुंबई यांनी चिखल पोस्टला येवून रिपोर्ट दिल्यावरून चिखली पोलिसांनी कायमी अप नं ३२०/२०२४ कलम ३७९ भादवी सदरचा गुन्हा दाखल केला.

# गळफास घेवून ग्रामसेवकाची आत्महत्या...

**जनसंचलन/हिवरा आश्रम**

५२ वर्षीय निलंबित ग्रामसेवकाने राहत्या घरामध्ये पत्रा खालच्या लाकडी बल्लीला दोरीच्या साह्याने गळफास लावून आत्महत्या केली ही घटना शिवाजीनगर येथे आज दिनांक २९ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजता घडली साखरखेर्डा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या शिवाजीनगर येथील रहिवासी असलेले रामेश्वर पुंडलिक काकडे यांना एक मुलगा एक मुलगी पत्नी वडील असून रामेश्वर काकडे हे ग्रामसेवक होते त्यांना सात ते आठ वर्षापूर्वी निलंबित केले होते त्यांनी राहत्या घरातच पत्राखालील लाकडी बल्लीला दोरी बांधून गळफास घेऊन आत्महत्या केली सदर घटनेची माहिती साखरखेर्डा पोलिसांना दिली माहिती मिळताच ठाणेदार स्वप्निल नाईक यांच्या



मार्गदर्शनाखाली बीट जमादार डोईफोडे यांनी घटनास्थळी येऊन पंचासमक्ष पंचनामा करून मर्ग दाखल केला.

# आदर्श मतदान केंद्रे ठरली आकर्षण

**जनसंचलन/बुलढाणा**

लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी निवडणूक विभागातर्फे वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले. याचाच एक भाग म्हणून जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघांत महिला व्यवस्थापन मतदान केंद्र, दिव्यांग व्यवस्थापन मतदान केंद्र, युवा कर्मचारी व्यवस्थापन मतदान केंद्र आणि आदर्श मतदान केंद्र स्थापन करण्यात आली होती. ग्रामीण भागातील आदर्श मतदान केंद्रांवर सजावट करण्यात आली होती. त्यामुळे ही केंद्रे




आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली होती. ४८ आदर्श मतदान केंद्र ही बुलढाणा लोकसभा मतदारसंघात येतात. या केंद्रांवर ग्रामीण भागात आकर्षक सजावट करण्यात आली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भारतातील कामगारांचे भाग्यविधाते डॉ.बाबासाहेब आंबेडकर...



महापुरूष इतिहास घडवत असतात. त्याची जाणिव समकालीन जनतेला नसते. तो हयात असेपर्यंत अनेकदा अशा महापुरुषांना टिकेला. निंदा नालस्तीला इतकेच नव्हे तर कधी-कधी अपमानास्पद वागणूकही सहन करावी लागत असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आयुष्यात असे प्रसंग अनेकदा आले आहेत. त्यांनी भारतातील जनतेसाठी जे काही करण्याचा प्रयत केला, ज्यांच्यासाठी करण्याचा प्रयत्न केला, त्यांच्याकडून अनेकदा अज्ञानापेटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या त्रास सहन करावा लागला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एक संपन्न, प्रगतीशील आणि उन्नत भारत देश घडविण्याचे स्वप्न पाहिले. त्यासाठी त्यांनी एकाचवेळी विविध आघाड्यांवर कार्य केले. त्यांनी युरोप आणि अमेरिकेसारख्या देशाने कामगाराच्या कृतीशीलतेने देशाचा विकास झालेला पाहिला होता. परदेशात धमला प्रतिष्ठा होती. कष्ट करणात्यांचा सन्मान होतांना त्यांनी अनुभवले होते. भारत देशात मात्र थम करणारी मंडळी ही चातुर्वर्ण्य व्यवस्थेनुसार खालच्या म्हणजे अतिशुद्र, शुद्र मानली जायची म्हणजे शुद्र-अतिशुद्रांनी केलेली कामही अप्रतिष्ठीत मानली जायची. म्हणून अंगमेहनतीची कामं, शारीरकि धम ही केवळ ओबीसी बहुजन वर्ग करत होता. भारतीय सामाजिक व्यवस्थेनुसार कामाची विभागणी केलेली असल्याने वरीलप्रमाणे कष्टकरी, बमकरी व्यक्ती ही अप्रतिष्ठीत मानली जायची. वरीलप्रमाणे कष्टकरी, श्रमकरी व्यक्ती ही अप्रतिष्ठीत असते. त्यामुळे समाज व्यवस्थेनुसार भारतीय परिप्रेक्षात श्रमाला प्रतिष्ठा नव्हती म्हणून आपला देश स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात द्योगिकदृष्ट्या अप्रगतही होता. जगात असणारी साधन-स सुविधा स्वप्रवत वाटत होती. वास्तवात भारत देशात नैसर्गिक खनिज संपत्ती, उत्पन्नाचे साठे मुबलक उपलब्ध होते. परंतु प्रगत तंत्रज्ञान, आधुनिक शिक्षण नसल्याने या संपत्तीचा योग्य उपयोग करून घेता येत नव्हता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जागतिक पातळीवर होणाऱ्या घडामोडींवर लक्ष ठेवून होते. इतर देशातील सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, अध्यात्मिक आणि प्रागतिक वाटचालीकडे डोळसपणे बघत होते. अभ्यासत होते. त्यांच्या लक्षात आले होते की, भारताचाहेरच्या राष्ट्रात श्रमाला प्रतिष्ठा आहे. तेथे कष्टकरी, कामगार आणि स्त्रियांचा सन्मान होतो. भारतात या वार्दीकडे समाजाचे लक्ष वेधल्या शिवाय देशाची प्रगती होऊ शकत नाही. १५ ऑगस्ट १९३६ रोजी डॉ. बाबासाहेव आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. वास्तविकता या पक्षाची स्थापना करण्यापूर्वी त्यांनी १९२४ मध्ये बहिष्कृत हितकारीणी सभा तर १९२७ मध्ये समता सैनिक दलाची स्थापना केलेली होती. तरीही १९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करतात. माझ्यामते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बदलत्या काळाची, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी त्यांच्या नवनवीन उपक्रम सुरू करण्याला आहे. त्यांची स्वतंत्र चर्चा करता येईल. स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करतांना या पक्षाची ध्येय धोरण कामगार, शेतकरी यांची संघटना बांधून त्यांचे राहणीमानात सुधारणा करणे, कामगारांच्या हिताच्या दृष्टीने कायदे करण्याची शिकस्त करील. नोकऱ्या देणे, बडतर्फी करणे, कारखान्यात बढ़ती देणे. कामगारांना स्वस्त आणि आरोग्यदायक वस्तीस्थ-ानाची तरतूद करणे. आजच्या सिडको हडको म्हाडा ह्या गृहनिर्माणाच्या योजनांची पायाभारणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३६ मध्ये केली होती. बेकारीपासून मुक्तता व्हावी म्हणून भूमिहिनांना जमिनी देऊन त्यांच्या वसाह-ती स्थापण्यात येईल. जनहिताची कामे आरंभण्यात येतील. औद्योगिक धंद्याची केंद्रे, मोठी नगरे यातून कनिष्ठ मध्यम वर्गाला घरभाडे कमी पडाचे म्हणून तरतूद करण्यात येईल. असा या स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहिरनामा काढून आश्वासन दिले होते. सामाजिक सुसंवाद हा कामगार धोरणांचा पाया असला पाहिजे. त्यासाठी सरकार, कामगार संघटना, मालक संघटना आणि इतर सामाजिक घटकांमध्ये सातत्याने संवाद असणे गरजेचे असते. त्याद्वारे कामगारहीत आणि मालकहीत दोन्ही पातळीवर जोपास-ले पाहिजे, अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका होती. त्याद्वारे शोषणमुक्त समाज निर्माण व्हावा असे त्यांना वाटे. जाती व वर्गविहीन, स्त्री- पुरुष समानतेवर आधारीत समाज व्यवस्था, दुर्बल घटकांना संरक्षण व त्यांच्या कल्याणाची जबाबदारी, साधनसंपत्तीचे समान वाटप नियोजनबद्ध अर्थव्यवस्था, शास-नाचा अर्थव्यवस्थेत परिणामकारक हस्तक्षेप, मुलभूत उद्योगांचे राष्ट्रीयीकरण, जात, धर्म, पंथ, लिंग भेदभाव विरहीत समाज व्यवस्था निर्माण करणे इत्यादीबाबत डॉ. आंबेडकर आग्रही हो-ते. दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर ९ जुलै १९४२ रोजी तत्कालीन ब्रिटीश शासनाने डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांची महाराज्यपालाच्या कार्यकारी परिषदेवरील नेमणूकीस मंजूरी दिल्याची घोषणा गव्हनर जनरलने केली. त्यानुसार व्हाईसरॉयच्या मंत्रीमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २७ जुलै १९४२ रोजी मंत्रीपदाचा पदभार स्विकारला. त्यांच्याकडे कामगार, सिंचन, बीज, मार्वजनिक बांधकाम आणि खाणकाम अशा एकुण पाच खात्यांच्या मंत्रीपदाचा काभार होता. कामगार मंत्री या नात्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय कामगार चळवळीला नवी दिशा देण्याची महत्त्वपूर्ण कार्य केले. थम म्हणजे काम हा विषय त्यांनी कामगार हिताचे रक्षण करण्यासाठी स्वातंत्र्यानंतरच्या काळात आणि देशाचे कायदामंत्री म्हणून भारतीय संविधानाच्या समवर्ती सूचीत समाविष्ट केला. व्हाईसरॉयच्या मंत्रीमंडळात कामगार मंत्री असताना डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी ७ ऑगस्ट १९४२ रोजी नवी दिल्ली येथे शासन, मालक आणि कामगारांच्या प्रतिनिधींची त्रीपक्षीय परिषद आयोजित केली होती. या परिषदेत कामगार हिताचे खालील काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आणि त्यास कामगार मंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मंजूरी दिली असल्याचे दिसून येते.

लेखक
सुरेश साबळे- बुलढाणा

# जातीवादी शिवीगाळ व मारहाण केल्याप्रकरणी काँग्रेसच्या माजी नगरसेवकावर गुन्हा दाखल...

**जनसंचलन/ चिखली**

बुथवर थांबू नको असे समजावले होते परंतु तू ऐकल नाहीस असे म्हणून सार्वजनिक ठिकाणी जातीवाचक शिवीगाळ केल्याच्या तक्रारीवरून चिखली येथील काँग्रेसचे माजी नगरसेवक दीपक खरात विरुद्ध चिखली पोलीस आणि ? ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे याबाबत फिर्यादी नारायण - विश्वनाथ कांबळे वय ३३ वर्ष व्यवसाय मजुरी रा. माळीपुरा वार्ड क्रं. ०१ चिखली २७ एप्रिल रोजी चिखली पोलीस चा तक्रार की माझ्या वडिलांना आरोपी नामे दीपक खरात याने बोलावून मी तुला पंचायत समिती बूथवर थांबू नको असे समजावले होते, परंतु तू ऐकले नाहीस असे म्हणून - सार्वजनिक ठिकाणी जातीवाचक शिवीगाळ केली व शर्टाची कॉलर पकडून उजव्या कानाखाली दोन चापटा मारल्या व जर इथून पुढे तू कोणत्याही कार्यक्रमात दिसला तर तुला तिथेच खल्लास करून टाकीन अशी धमकी दिली. फिर्यादीचे वडील सोडविण्यास आले असता त्यांना लोटपाठ करून जीवे मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरून काँग्रेस पक्षाचे माजी नगर-सेवक दीपक खरात रा माळीपुरा चिखलीविरुद्ध चिखली पोलिसांनी गु. र. नं. ३१७/२०२४ कलम ३(१), ३(१) अनुसुचीत जाती आणी अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतीबंधक अधीनीयम १९८९ सहकलम ३२३, ५०४, ५०६ भा.द.वी गुन्हा दाखल केला आहे. तपास अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी बुलढाणा. हे करीत आहेत.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958